# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

**प्रेस नोट**

दिनांक 03/05/2021 (सोमवार)

(सकाळ)

---

### घरफोडी

पो.स्टे. खापरखेडा :— अंतर्गत 8 कि.मी अंतरावर वार्ड क्र. 4, दहेगाव रंगारी येथे दि. 02/05/2021 चे 02.00 वा. ते 03.00 वा. चे रात्री फिर्यादी नामे— सिकंदर प्रसाद जियानंद सिंग, वय 62 वर्ष रा. वार्ड क्र. 04, दहेगाव रंगारी हे मुलीच्या घरी नागपूर येथे गेले त्यादरम्यान फिर्यादीयांचे दहेगाव येथील राहते बंद घराच्या दाराची अज्ञात आरोपीने कुंडी तोडून घरात प्रवेश केला. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने घरातील आलमारीतील डायमंड लॉकेट डिस्को मनी लागलेला किंमत 25,000/—रू. व सोन्याचे दागिने कि 34,000/—रू. असा एकुण कि. 59,000/—रू. चा मद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 457, 380 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा मेश्राम मो न 9823453169 हे करीत आहे.

### चोरी

1) पो.स्टे. केळवद :— अंतर्गत 12 कि.मी अंतरावर भागेमाहेरी शिवार येथे दि. 01/05/2021 चे 18.00 वा. ते दि. 02/05/2021 चे 08.00 वा. चे फिर्यादी नामे— रूपेश स्पचंद परतेकि, वय 28 वर्ष, रा. भागेमहेरी हे चौकीदार असलेल्या प्रावेस कंपनीतील अज्ञात आरोपीने ट्रान्सफारमरचे नटबोल्ट खोलुन त्यामधील ऑईल 630 लि, कॉपरप्लेट 20 किलो, असा एकुण कि. 1,89,200 /—रू. चा मद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. केळवद येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा श्री रामराव पवार 7875983360 हे करीत आहे.

2) पो.स्टे. मौदा :— अंतर्गत 05 कि.मी अंतरावर मोरोडी ता. मौदा येथे दि. 29/04/2021 चे 20.08 वा. ते दि. 30/04/2021 चे 08.00 वा. चे फिर्यादी नामे— लक्ष्मीकांत उपासरामजी देशमुख वय 30 वर्ष रा मारोडी ता मौदा यांचे जनरल स्टोर्स व मोबाइल रिपेरींग तसेच कार्ल्टींग सेटंर मध्ये अज्ञात आरोपीने खुल्या टिनाच्या शेड मधुन प्रवेश करून दुकानातील 1) ओपो कंपनीचा ए5एस मोबाईल किंमती 12,000/—रू., 2) जिओनी एफ 8 निओ कंपनीचा मोबाईल फोन किंमत 6,000/—रू., 3) ग्राहकांचे दुरूस्ती साठी आनलेला 5 मोबाईल फोन अंदाजे किंमत 8,000/—रू., 4) 50 मास्क प्रत्येकी 20 रू प्रामणे 1,000/—रू. व 5) 10 हेडफोन प्रत्येकी किंमत 30 रू असे एकुण 300/—रू. असा एकुण कि. 27,300/—रू. चा मुद्देमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे आरोपीविरुध्द कलम 379 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोहवा श्री कुथे 9764007720 हे करीत आहे.

## जबर दुखापत

1) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 14 कि.मी अंतरावर खापरी केने येथे दि. 02/05/2021 चे 13.00 वा. ते 13.30 वा. फिर्यादी नामे– सौ. गिताबाई जगदीश चंद्रावत वय 43 वर्ष रा. खापरी केने यांचे घरातील अंगणातील चारचाकी गाडी क्र. एम.एच. 40/बीजे– 5861 चे काच आरोपी 1) किरण भुरानी, 2) अनिल भुरानी, 3) दिपक भुरानी, 4) सुनिल भुरानी चारही रा. खापरी केने यांनी संगणमत करून फोडले. तसेच आरोपीतांनी फिर्यादीचे पती जगदीश चंद्रावत यांचे डोक्यावर लोखंडी रॉडने मारून गंभीर जखमी केले व शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटाल येथे आरोपीविरुध्द कलम 326, 324, 452, 427, 504, 506, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि संतोष निंभोरकर 9527347443 हे करीत आहे.

2) पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 14 कि.मी अंतरावर खापरी केने येथे दि. 02/05/2021 चे 13.00 वा. ते 13.30 वा. फिर्यादी नामे– किरण शिवलाल भुराणी वय 27 वर्ष रा. खापरी केने यांचा भाउ दिपक भुरानी व आरोपी क्र. 1. जगदीश चंद्रावत हे शेतात दारू पिण्याकरीता गेले होते. त्यानंतर दिपक याने घरी येवून फिर्यादीला सांगीतले की, ''जगदीश याने मला हातबुक्याने मारपीट केली'' यावरून लगेच फिर्यादी हा आरोपीचे घरासमोरून गावात येत असता, आरोपी क्र. 1) जगदीश च्रंद्रावत, 2) जयदेव चंद्रावत, 3) सागर चंद्रावत, 4) रोशन चंद्रावत चारही रा. खापरी केने यांनी संगणमत करून फिर्यादी सोबत भांडण करून शिवीगाळ करीत मारण्याची धमकी दिली. आरोपी क्र. 1) जगदीश व त्याचा मुलगा आरोपी क्र. 3) सागर चंद्रावत याने फिर्यादीचे डोक्यावर काठीने मारून गंभीर जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटाल येथे आरोपीविरुध्द कलम 326, 504, 506, 34 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि संतोष निंभोरकर 9527347443 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर